## ॥ श्री दत्ताची ॥

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ॥
नेति नेति शब्दें न ये अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता । आरती ओवाळीता हरली भवचिंता ॥१॥ धृ ॥

सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त । अभाग्यासी कैंची कळेल ही मात ॥
पराही परतली येथे कैंचा हा हेत । जन्म मरणाचा पुरलासे अंत ॥२॥ धृ ॥
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता । आरती ओवाळीता हरली भवचिंता ॥१॥ धृ ॥

दत्त येऊनियां उभा ठाकला । सद्भावें साष्टांगे प्रणिपात केला ॥
प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला । जन्म मरणाचा फेरा चुकविला ॥३॥ धृ ॥
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता । आरती ओवाळीता हरली भवचिंता ॥१॥ धृ ॥

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान । हारपले मन झाले उन्मन ॥
मी तूं पणाची झाली बोळवण । एका जनार्दनी श्रीदत्त जाण ॥४॥ धृ ॥
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता । आरती ओवाळीता हरली भवचिंता ॥१॥ धृ ॥

## ॥ प्रदक्षिणा ॥

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥

पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी । सर्वहि तीर्थे घडली आम्हां आदिकरुनि काशी ॥१॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥

मृदंग टाळ ढोल भक्त भावार्थे गाती । नामसंकीर्तने ब्रह्मानंदे नाचती ॥२॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥

कोटि ब्रह्महत्या हरती करितां दंडवत । लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत ॥३॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥

गुरुभजनाचा महिमा न कळे आगमा–निगमासी । अनुभव ते जाणती जे गुरुपदिंचे रहिवाशी ॥४॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥

प्रदक्षिणा करुनि देह भावे वाहिला । श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे राहिला ॥५॥
धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥

## ॥ श्रीअनसूयामातेची ॥

धरियेले गे माय श्रीदत्तगुरुंचे पाय, माये दत्तगुरुंचे पाय । अनसूये सांग तुजविण कोण करी उपाय ॥ धृ ॥

दत्तगुरुंची आज्ञा हेचि तुझे मूळ रुप, माये तुझे मूळ रुप । महाविष्णुसी सांभाळिसी तू मांडीवर घेऊन ॥१॥ धृ ॥
धरियेले गे माय श्रीदत्तगुरुंचे पाय, माये दत्तगुरुंचे पाय । अनसूये सांग तुजविण कोण करी उपाय ॥ धृ ॥

लक्ष्मी पार्वती सरस्वतीसी देसी आश्रय, माये देसी आश्रय । त्यांचे पति देऊनि करिसी प्रपंच प्रतिपाळ ॥२॥ धृ ॥
धरियेले गे माय श्रीदत्तगुरुंचे पाय, माये दत्तगुरुंचे पाय । अनसूये सांग तुजविण कोण करी उपाय ॥ धृ ॥

वनवासासी निघता जानकी चूडामणि दिधला, माये चूडामणि दिधला । हनुमंताच्या हातूनि पुन्हा रामा पावला ॥३॥ धृ ॥
धरियेले गे माय श्रीदत्तगुरुंचे पाय, माये दत्तगुरुंचे पाय । अनसूये सांग तुजविण कोण करी उपाय ॥ धृ ॥

जय माते जय त्राते भरवी घास गे मजला, माये घास गे मजला । आरती करितो अनिरुद्ध हा तुझा तान्हुला ॥४॥ धृ ॥
धरियेले गे माय श्रीदत्तगुरुंचे पाय, माये दत्तगुरुंचे पाय । अनसूये सांग तुजविण कोण करी उपाय ॥ धृ ॥

## ॥ श्रीदेवीची ॥

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ।
वारीं वारी जन्म-मरणाते वारीं । हारीं पडलो आतां संकट निवारी ॥
जय देवी जय देवी जय महिषासुरमथिनी । सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ धृ ॥

त्रिभुवनी पाहतां तुजऐसी नाही । चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ।
साही विवाद करितां पडलो प्रवाहीं । ते तूं भक्तालागीं पावसी लवलाही ॥२॥
जय देवी जय देवी जय महिषासुरमथिनी । सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ धृ ॥

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां । क्लेशांपासुनी सोडवी तोडीं भवपाशा ।
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लीन झाला पदपंकजलेशा ॥३॥
जय देवी जय देवी जय महिषासुरमथिनी । सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ धृ ॥

## ॥ श्री महिषासुरमर्दिनीची ॥

माते गायत्री, सिंहारूढ भगवती–महिषासुरमर्दिनी, क्षमस्व चण्डिके ।
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

प्रतिपदा,घोररुप महाकाली–असुरों को भयकारी, रक्ष चण्डिके ॥२॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

द्वितीया,कनकांगी महालक्ष्मी–सर्वविघ्ननाशिनी, रक्ष चण्डिके ॥३॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

तृतीया,महासरस्वती राज्ञी–सर्वरोगनाशिनी, रक्ष चण्डिके ॥४॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

चतुर्थी,रक्तदन्तिका योगिनी–असुररक्तप्राशिनी, रक्ष चण्डिके ॥५॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

पंचमी,नीलवर्ण शताक्षी–अन्नजलदायिनी, रक्ष चण्डिके ॥६॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

षष्ठीते,श्रीरामवरदायिनी–अशुभनाशिनी, रक्ष चण्डिके ॥७॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

सप्तमी,नन्दिनी गर्भदायिनी–श्रीकृष्णतारिणी, रक्ष चण्डिके ॥८॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

अष्टमी,दत्तमंगला चण्डिका–श्रीगुरुभक्तिरुपा, रक्ष चण्डिके ॥९॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

नवमी,नित्या मन्त्रमालिनी–कलिमलहारिणी, रक्ष चण्डिके ॥१०॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥

कृपा करो,अशुभ हरो–हे वज्रमंडलराज्ञी, रक्ष चण्डिके ॥११॥
जय दुर्गे, अखिल विश्‍व की जननी माँ उदे उदे उदे उदे उदे ॥१॥ धृ ॥